दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १४६ • RNI : MAHMAR/2023/87818 • शनिवार दि.२९ मार्च २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro, Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोळोना (घोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

# शिवप्रेमींच्या संयमाचा कडेलोट होण्यापूर्वी छत्रपतींचा अधिकृत इतिहास प्रसिध्द करा

## खासदार उदयनराजे भोसले गृहमंत्री अमित शहांना भेटले

**सातारा (वृत्तसंस्था): आमच्या संयमाचा कडेलोट होण्यापूर्वी राज्य आणि केंद्र सरकारने छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराजांसह मराठा साम्राज्याचा अधिकृत इतिहास प्रसिध्द करावा, अशा खरमरीत भाषेत छत्रपतींचे वंशज खा. उदयनराजे भोसले यांनी आज केंद्रीय गृहराज्यमंत्री अमित शहांना निवेदन दिलं आहे. तसेच महापुरूषांबद्दल अवमानकारक वक्तव्य करणाऱ्यांसाठी अजामीनपात्र आणि १० वर्षांच्या शिक्षेचा कायदा पारित करण्याची मागणीही केली आहे.**



छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्वधर्म समभावाच्या विचारातून स्वराज्याची स्थापना केली. राज्यकारभारात रयतेच्या सहभागातून लोकशाहीचा पाया रचला. मात्र, काही विकृत मनोवृत्तीचे लोक गलिच्छ पध्दतीने छत्रपती शिवाजी महाराज, संभाजीराजे आणि राजमाता जिजाऊंबद्दल अवमानकारक भाष्य करत आहेत. त्यातून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन समाजात दुफळी निर्माण होत असल्याचं खा. उदयनराजे भोसले यांनी निवेदनात म्हटलं आहे.महापुरुषांबद्दल अवमानकारक वक्तव्य करणाऱ्या प्रवृत्तींची जीभ छाटण्याची धमक शिवप्रेमींमध्ये आहे. मात्र, आम्ही संयम राखून आहोत, असा इशारा खा. उदयनराजे भोसले यांनी निवेदनात दिला आहे. केंद्र आणि राज्य सरकारने अशा प्रवृत्तींना धडकी भरवणारा अजामीनपात्र आणि १० वर्षे सश्रम कारावासासह जबर दंडाची शिक्षा असणारा विशेष कायदा पारित करावा. अन्यथा छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेण्याचा कोणालाच अधिकार राहणार नाही, असेही त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

ऐतिहासिक चित्रपट, दूरदर्शन मालिका, वेबसिरिज, डॉक्युमेंटरीजच्या चित्रिकरणापूर्वी सेन्सॉर बोर्डाला सहाय्यभूत ठरेल, अशी इतिहासकार, संशोधक आणि इतिहास तज्ज्ञांचा समावेश असलेली कमिटी स्थापन करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. कमिटीच्या शिफारशी विचारात घेवून सेन्सॉरशिप लागू केल्यास इतिहासाच्या संदर्भातील संभाव्य विरोधाभास टाळता येईल आणि सामाजिक स्वास्थ्य अबाधित राहील, असा विश्वास उदयनराजेंनी व्यक्त केलाय.

**“ छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याची प्रचिती देणारे राष्ट्रीय स्मारक नवी दिल्लीत उभारणे गरजेचे आहे. या स्मारकामध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर संशोधन आणि संकलित केलेले अप्रकाशित दस्तावेज, चित्रे, शस्त्रास्त्रे, ऐतिहासिक नोंदी, कलाकृती, युध्दनितीचा समावेश असावा. राजगड, रायगड, अजिंक्यतारा हे राजधानीचे किल्ले असणाऱ्या परिसराचा विकास करावा. अरबी समुद्रात छत्रपतींचे स्मारक लवकरात लवकर उभारण्यात यावे, अशा मागण्याही खासदार उदयनराजेंनी निवेदनात केल्या आहेत.**

### महाराष्ट्र वैद्यकीय परिषद निवडणूक २०२५

## मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा जिल्हाधिकारी यांचे आवाहन

**गडचिरोली । प्रतिनिधी**

महाराष्ट्र वैद्यकीय परिषद निवडणूक २०२५ करीता मतदान दिनांक ०३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ८.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत मतदान केंद्र क्र. १/१ – गडचिरोली, जिल्हा रुग्णालय प्रशिक्षण केंद्र, जुने शल्य चिकित्सक कक्षाजवळ, तळमजला, कॉम्प्लेक्स, जिल्हा सामान्य रुग्णालय, गडचिरोली येथे होईल. मतदान प्रक्रिया शांततेत व पारदर्शकपणे पार पडावी, तसेच जास्तीत जास्त वैद्यक क्षेत्रातील मतदारांनी आपला लोकशाही हक्क बजावावा असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्री अविश्यांत पंडा यांनी केले आहे.



मतदान करतांना महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे ओळखपत्र, नोंदणी प्रमाणपत्र किंवा निवडणूक ओळखपत्र यापैकी कोणतेही एक वैध ओळखपत्र मतदाराने सोबत आणणे आवश्यक आहे.

## मूल पोलिसांची कारवाई : १२.९१ लाखांच्या विदेशी दारूसह वाहन जप्त

**मूल । प्रतिनिधी**

गडचिरोली जिल्ह्यात दारूबंदी असतानाही अवैध दारू वाहतूक करण्याचा प्रयत्न मूल पोलिसांनी उधळून लावत १२ लाख ९१ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलीस स्टेशन मूलचे परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक प्रमोद चौगुले, पोलीस हवालदार जमीरखान पठाण आणि नरेश कोडापे यांनी मूल–गोंडपिपरी मार्गावरील नवेगाव भुजला ते बेंबाळ गावदरम्यान नाकाबंदी केली. संध्याकाळी ७ वाजता गोंडपिपरीहून खेडीकडे जाणारी MH-34-CD-7116 क्रमांकाची ग्रे सुझुकी



इंडिका कार पोलिसांनी थांबवली.तपासणीदरम्यान, वाहनाच्या मागील सीट आणि डिक्कीत ठेवलेल्या खोक्यांमध्ये विदेशी दारू आढळून आली. सदर दारूची किंमत २ लाख ९१ हजार ५४० रुपये असून, पोलिसांनी १० लाख रुपये किमतीचे वाहनही जप्त केले आहे. पोलिसांनी वाहनचालक खुशाल भैयाजी बांगडे (रा. नांदाफाटा, ता. कोरपना, जि. चंद्रपूर) याला अटक केली. चौकशीदरम्यान, ही दारू बल्लारशाह येथील पवन जयस्वाल यांच्याकडून घेऊन सावली तालुक्यातील व्याहाड येथे निखील मंडलवार यांना पोहोचविण्याचे नियोजन असल्याचे उघड झाले. या माहितीच्या आधारे पोलिसांनी खुशाल बांगडे, पवन जयस्वाल आणि निखील मंडलवार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. जयस्वाल आणि मंडलवार फरार असून, पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. या कारवाईसाठी पोलीस अधिक्षक मुमक्का सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी ठाणेदार तथा परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक प्रमोद चौगुले आणि त्यांच्या सहकाऱ्यांकडून पुढील तपास सुरू आहे.

### देव तारी त्याला कोण मारी!

## दोन दिवस उपाशीपोटी विहिरीत अडकला,तिसऱ्या दिवशी सुखरूप बाहेर

**पिशोर । प्रतिनिधी**

‘देव तारी त्याला कोण मारी’ या म्हणीचा प्रत्यय देणारी घटना पिशोर येथे घडली. संदीप ओंकार घटकवडे (वय ३०, रा. वाढवणा, ता. जालना) हा दोन दिवस व दोन रात्री विहिरीत अडकून राहिल्यानंतर तिसऱ्या दिवशी सुखरूप बाहेर काढण्यात आला.

२५ मार्च रोजी संध्याकाळी संदीप घटकवडे पिशोर येथे आपल्या नातेवाईकांकडे आला असताना, कुत्र्यांपासून वाचण्यासाठी पळत असताना प्रकाश अमृता डहाके यांच्या अंजना मध्यम प्रकल्पाखालील भूमिगत विहिरीत पडला.विहिरीत १५ ते १६ फूट पाणी असल्याने तो पाण्यावर बुचकळला. मात्र, त्याने धैर्याने विहिरीतील दोरी आणि पाईप पकडून स्वतःचा जीव वाचवला. विहीर निर्मनुष्य ठिकाणी असल्याने त्याच्या आवाजाला कोणाचाही प्रतिसाद मिळाला नाही. तो सतत आरडाओरड करत राहिला,



पण मदतीसाठी कोणीही हजर नव्हते. २७ मार्च रोजी दुपारी काही मुले चिकूच्या बागेत खेळण्यासाठी गेली असताना त्यांना विहिरीतून आवाज आला. त्यांनी ही माहिती शेतकरी राजू नवले यांना दिली. राजू नवले यांनी गणेश मोकासे यांना कळवले, त्यानंतर बिट अंमलदार संजय दराडे यांनाही माहिती देण्यात आली. बिट अंमलदार वसंत पाटील, गणेश मोकासे व इतर सामाजिक कार्यकर्त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी दोरीच्या सहाय्याने संदीप घटकवडे यास तिसऱ्या दिवशी सुखरूप विहिरीबाहेर काढले. या थरारक घटनेनंतर मदत करणाऱ्या नागरिकांचे व प्रशासनाचे गावभर कौतुक होत आहे. संदीप घटकवडे यांनी धैर्य आणि संयम ठेवत स्वतःचा जीव वाचवला, तर प्रशासनाच्या वेगवान हालचालीमुळे त्याला अखेर जीवदान मिळाले.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिरासाठी दरमहा ५० हजार रुपये मिळणार : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई (वृत्तसंस्था)**–क्रूरकर्मा औरंगजेबाच्या कबरीसाठी लाखो रुपये खर्च होत असतांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिरासाठी तुटपुंजे अर्थसाहाय्य हा अन्याय आहे, अशी भूमिका हिंदु जनजागृती समितीच्या शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोर मांडली. या मागणीवर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी महसूल विभागाच्या सचिवांना (श्री शिवराजेश्वर मंदिरासाठी) दरमहा ५० हजार रुपये निधी वाढवून देण्यासाठी तात्काळ प्रस्ताव सादर करण्याचे लिखित आदेश दिले. तसेच महसूल विभागाच्या सचिवांना दूरध्वनी करून मंदिरासाठी दरमहा २५० रुपयांऐवजी ५० हजार रुपये देण्याचे स्पष्ट आदेशही दिले. या वेळी शासनाची मदत मिळण्याआधी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी तातडीने वैयक्तिकरित्या महाराजांच्या मंदिरासाठी ५० हजार रुपयांचे साहाय्य करून एक चांगला पायंडाही पाडला. तसेच त्यांनी नियमितपणे मंदिरासाठी निधी घेऊन जाण्यासही सांगितले. हिंदु जनजागृती समितीच्या वतीने उपमुख्यमंत्र्यांनी दिलेल्या सकारात्मक प्रतिसादाबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले. या प्रसंगी समितीच्या वतीने सतीश सोनार,



रवि नलावडे आणि नांदेड येथील शिवसेनेचे आमदार आनंद बोंडारकर उपस्थित होते. केंद्रात काँग्रेस सरकारच्या काळात वर्ष २०१२ पासून क्रूरकर्मा औरंगजेबाच्या कबरीसाठी निधी देणे सुरू करण्यात आले होते. नोव्हेंबर २०२३ पर्यंत भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाने औरंगजेबाच्या कबरीच्या देखभालीसाठी ६.५० लाख रुपयांहून अधिक निधी खर्च केला आहे. महाराष्ट्राच्या अस्मितेचा विचार करता औरंगजेब हा एक क्रूर आक्रमक होता. त्याने छत्रपती संभाजी महाराजांवर अमानुष अत्याचार करून निर्घृण हत्या केली. असा आक्रमक आदरास पात्र नाही आणि त्याच्या कबरीच्या देखभालीसाठी निधी खर्च करणे महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला ठेच पोहोचवणारे आहे. त्यामुळे हा निधी सरकारने बंद करावा आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिरासाठी भरीव निधी द्यावा, अशी मागणी समितीने केली.छत्रपती राजाराम महाराजांनी स्वत: मालवण येथील सिंधुदुर्ग किल्ल्यावर बांधलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे हे एकमेव आणि प्राचीन मंदिर आहे. त्यामुळे येथे लाखो शिवप्रेमी आणि पर्यटक येतात. किल्ल्यावर बोटीने यावे लागते. त्यामुळे येणार्या पर्यटकांची योग्य सोय करणे आवश्यक आहे. किल्ला मोठा असल्यामुळे झाडी–झुडपे मोठ्या प्रमाणावर वाढली आहेत. त्या हटवून किल्ल्याचे सुशोभीकरण करणे, परिसरात सुंदर बगीचा तयार करणे, पर्यटकांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय, प्रसाधनगृह आणि गोड्या पाण्याच्या विहिरीचे सुशोभीकरण करणे यां सारखी अनेक विकास कामे तातडीने व्हावीत, अशी मागणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

## पंतप्रधान मोदींचा नागपूर दौरा ठरला:गुढीपाडव्याला येणार

**नागपूर (वृत्तसंस्था)**–गुढीपाडव्याला ३० मार्च रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी नागपुरात येत आहेत. त्यांच्या सुरक्षेसाठी शहरात चार हजारांहून अधिक पोलिस तैनात केले जाणार आहेत. राज्य राखीव पोलिस दलाच्या पाच तुकड्या आणि दीड हजारांहून अधिक होमगार्ड यांचीही मदत घेतली जाणार आहे.पंतप्रधान मोदी १२ वर्षांनंतर रेशीम बागेतील स्मृति मंदिराला भेट देणार आहेत. ते या मंदिराला भेट देणारे पहिले पंतप्रधान ठरतील. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षात हा दौरा ऐतिहासिक मानला जात आहे.

पंतप्रधानांचे सकाळी ८.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन होईल. त्यानंतर ते रेशीम बागेतील डॉ. हेडगेवार स्मृति मंदिरात आद्य सरसंघचालक डॉ. हेडगेवार आणि द्वितीय सरसंघचालक गोळवलकर गुरूजी यांच्या स्मृतींना अभिवादन करतील. सकाळी ९ वाजता दीक्षाभूमी येथे जाऊन ३ ते ५ मिनिटे ध्यान करतील.

त्यानंतर सकाळी १० वाजता वासुदेव नगर परिसरातील माधव नेत्रालयाच्या इमारतीचे भूमिपूजन करतील. कार्यक्रमानंतर विमानतळावरून विशेष हेलिकॉप्टरने बाजारगाव येथील सोलार एक्सप्लोझिव्ह शस्त्र निर्मिती कारखान्याला भेट देणार आहेत.भाजपने पंतप्रधानांच्या स्वागतासाठी मोठी तयारी केली आहे. त्यांच्या मार्गावरील ३० किलोमीटरचा रस्ता आणि ४७ चौक सुशोभित केले जाणार आहेत. विविध राज्ये आणि संप्रदायाच्या परंपरेनुसार वेशभूषेत कार्यकर्ते स्वागत करणार आहेत.

### अजित पवारांचे बारामतीकरांना आवाहन

## माझ्यासारखा आमदार परत कधीच होऊ शकत नाही!

**पुणे । प्रतिनिधी**

बारामती तालुक्यातील माळेगाव सहकारी साखर कारखाना परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या नूतनीकरण सोहळ्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाषण केले.

यावेळी ते म्हणाले, मी पाच वर्षांत जर पाच हजार कोटी मंजूर करून आणले नाहीत, तर अजित पवार नाव सांगणार नाही. बारामतीकरानो, माझ्यासारखा आमदार परत कधीच होऊ शकत नाही. बाकीच्यांचा घास नाही घास. मला लोकांनी लाखापेक्षा जास्त मतं दिली आहेत.राज्य सरकारने बंद पाईपलाइनद्वारे पाणीपुरवठा करण्याचे धोरण स्वीकारले आहे. यावर बोलताना ते म्हणाले, जूनपर्यंत तुमच्या कॅनल बंद होणार नाहीत. सरकारच्या स्थैर्यावर बोलताना ते म्हणाले, हे सरकार पाच वर्षे पूर्ण करणार आहे. सहकार खाते राष्ट्रवादीकडे आहे, त्यामुळे मी प्रश्न लवकर सोडवू शकतो. एक्साईज खातं माझ्याकडेआहे, त्यामुळे काही परवानग्या असतील तर त्या मीच देऊ शकतो. मी मोठ्या हॉस्पिटलसाठी काही जागा राज्य सरकारच्या अखत्यारीत आणल्या आहेत. त्या गरिबांसाठीच आहेत. तुम्ही आजपर्यंत मला जशी साथ दिली, तशीच साथ द्या. यामुळे बारामतीतील राजकारण तापण्याची शक्यता आहे.



# ग्रामसेवक शिदोडकर यांना बडतर्फ करण्याची आणि गैरप्रकाराने नियुक्त ऑपरेटरवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी

**पुलगाव । प्रतिनिधी**

आपटी ग्रामपंचायतीत झालेल्या गैरप्रकारांविरोधात गावकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून, ग्रामसेवक गजानन शिदोडकर यांना बडतर्फ करण्याची तसेच गैरप्रकाराने नियुक्त केलेल्या कंप्युटर ऑपरेटर रुपाली हनुमान कात्रे यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे.गावातील युवकांनी २० मार्च रोजी पत्रकार परिषद घेऊन या प्रकरणाचा पर्दाफाश केला. त्यांच्या मते, रुपाली कात्रे या मूळच्या गुंजखेडा गावच्या रहिवासी असून, त्यांना प्रथम तात्पुरत्या स्वरूपात सहा वर्षांसाठी मानधन तत्वावर कंप्युटर ऑपरेटर म्हणून ठेवण्यात आले. त्यानंतर नियम डावलून आणि गैरप्रकार करून त्यांना शिपाई पदावर कायमस्वरूपी नियुक्त करण्यात आले. गेली सहा वर्षे त्या कंप्युटर ऑपरेटर म्हणून कार्यरत असताना अचानक शिपाई पदावर कायम करण्यात आले, यावर गावकऱ्यांनी आक्षेप घेतला आहे.

ग्रामसेवक शिदोडकर यांना विचारणा केल्यास रुपाली कात्रे या आपटी वाघोली येथील रहिवासी असल्याचे सांगण्यात आले. मात्र, पत्रकार परिषदेत गावकऱ्यांनी हे खोटे ठरवले. २०१४ मध्ये त्या गुंजखेडा ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत विजयी झाल्या होत्या आणि २०१४ ते २०१९ दरम्यान त्या ग्रामपंचायत सदस्या होत्या, तसेच मतदार यादीत त्यांचे नाव आहे, असे गावकऱ्यांनी उघड केले. त्यामुळे त्या आपटीच्या स्थानिक रहिवासी नसताना आणि शासन नियमांना हरताळ फासत त्यांची नियुक्ती करण्यात आली, हा गंभीर प्रकार असल्याचा आरोप करण्यात आला आहे.गावकऱ्यांनी आणखी एका अन्यायकारक घटनेकडे लक्ष वेधले. ग्रामपंचायतीत मागील ३० वर्षांपासून कार्यरत असलेल्या शिपाई वसंतराव लोणारे यांना पूर्वी १२,००० रुपये वेतन मिळत होते, मात्र सध्या त्यांचे वेतन केवळ ८,००० रुपये करण्यात आले आहे. त्यांच्यावर पाणीपुरवठा विभागाचे काम लादून त्यांचे शिपाई पदावरचे अधिकार कमी करण्यात आले आहेत, तर नवीन नियुक्ती करण्यात आलेल्या रुपाली कात्रे यांना विशेष वागणूक मिळत आहे, हा पक्षपातीपणा का? असा सवाल गावकऱ्यांनी उपस्थित केला.गेल्या पाच वर्षांपासून ग्रामसभा घेण्यात आलेली नाही आणि लोकांच्या घरी जाऊन जबरदस्तीने सही घेतल्याचे आरोपही करण्यात आले आहेत. गावातील अनेक प्रश्न प्रलंबित असून, ग्रामसेवक शिदोडकर यांना त्वरित बडतर्फ करण्यात यावे आणि गैरप्रकाराने नियुक्त केलेल्या रुपाली कात्रे यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी गावकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी अर्जाद्वारे केली आहे. या अर्जावर समाजसेवक गजानन पचारे, सुजन कावडे, गजानन प्रजापती, हर्षल पाडले, किसना शिवरकर, प्रणय बाबाळे, सूरज मांढरे, धनंजय गाडवे, प्रभाकर शिंदे, गजानन पवार, प्रमोद शिंदे यांची स्वाक्षरी आहे.



पत्रपरिषदेत माहिती देताना गजानन पचारे, माजी उपसरपंच मनोज गाढवे, वसंतराव लोणारे

> **“ ग्रामसेवक शिदोडकर यांनी आपले स्पष्टीकरण देताना सांगितले की, वसंतराव लोणारे हे पाणीपुरवठा विभागात कार्यरत होते आणि त्यांना आवश्यक ते मानधन दिले जात होते. मात्र, त्यांचे कार्य समाधानकारक नसल्यामुळे ग्रामपंचायतीने ठराव घेऊन रुपाली कात्रे यांची शिपाई म्हणून नियुक्ती केली. यावेळी सर्व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते आणि उपसरपंच मनोज गाढवे यांनीही ठरावावर सही केली होती.शिदोडकर यांनी स्पष्ट केले की, कोणालाही तडकाफडकी नोकरीवरून काढता येत नाही आणि नियुक्ती प्रक्रियेवर आक्षेप असल्यास संबंधित कर्मचाऱ्याला कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. तसेच, वसंतराव लोणारे यांचा पगार नियमित सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.तथापि, गावकऱ्यांनी केलेले आरोप गंभीर असून, शासन नियम डावलून गैरप्रकाराने झालेल्या नियुक्तीच्या पार्श्वभूमीवर पुढील कारवाई काय होते, याकडे संपूर्ण गावाचे लक्ष लागले आहे.**
>
> **–ग्रामसेवक गजानन शिदोडकर**

# शिक्षिका कल्पना नेहे यांना राज्यस्तरीय ‘उत्कृष्ट मराठी अध्यापन सेवा कार्य गौरव’ पुरस्कार

**कोल्हार । प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण विद्यालय, राजुरी येथील शिक्षिका कल्पना किशोर नेहे यांना ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था तर्फे राज्यस्तरीय ’उत्कृष्ट मराठी अध्यापन सेवा कार्य गौरव’ पुरस्कार प्रदान करण्यात आला. रविवार, २३ मार्च २०२५ रोजी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त हा पुरस्कार देण्यात आला. कल्पना नेहे यांनी मराठी विषयाच्या अध्यापन क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्यासाठी हा पुरस्कार मिळवला आहे. त्यांचे अध्यापन कौशल्य, विद्यार्थ्यांसोबतचा संवाद आणि मराठी भाषेच्या संवर्धनासाठी केलेले प्रयत्न समाजासाठी प्रेरणादायी ठरले आहेत. त्यांच्या योगदानाबद्दल समाजाच्या सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.कल्पना नेहे यांचे शाळेतील सहकारी शिक्षकवृंद, कर्मचारी वर्ग आणि विद्यार्थ्यांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांच्या मार्गदर्शन क्षमतेचे आणि शिक्षण क्षेत्रातील योगदानाचे सर्वत्र कौतुक होत आहे.प्रेरणादायी कार्य हे नेहमीच यशाला जन्म देते, आणि कल्पना नेहे यांनी त्याचे उत्तम उदाहरण निर्माण केले आहे, असे गौरवोद्गार पुरस्कार वितरण सोहळ्यात व्यक्त करण्यात आले. कल्पना नेहे यांच्या पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा!




# देवळीत विश्व हिंदू परिषद प्रेरित बजरंग दल तर्फे भव्य पाडवा पहाट कार्यक्रमाचे आयोजन

**देवळी । प्रतिनिधी**

मराठी नववर्षाचे स्वागत उत्साहात करण्यासाठी विश्व हिंदू परिषद प्रेरित बजरंग दल, देवळी तर्फे पाडवा पहाट या विशेष भक्तिमय संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम ३० मार्च २०२५ रोजी पहाटे ४ वाजता गांधी चौक, देवळी येथे पार पडणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात गुढी उभारून होणार असून, त्यानंतर इंडियन आयडल प्रसिद्ध गायक प्रेम राहुल खरे (संभाजीनगर) आणि सुप्रसिद्ध गायिका भारतीताई नलगे यांच्या अभंगवाणी व भक्तिमय संगीताने वातावरण



भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन माजी खासदार रामदासजी तडस यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी देवळी-पुलगाव विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय आमदार मा. राजेशजी बकाने उपस्थित राहणार आहेत.दरवर्षीप्रमाणे यंदाही बजरंग दल, देवळी तर्फे पाडवा पहाट कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. तालुका अध्यक्ष मोहन जोशी, जिल्हा सहसंयोजक दिनेश क्षीरसागर, गोल्डी बग्गा, अनिल क्षीरसागर, गजानन महल्ले, प्रवीण तेलरांधे, अमोल गोडबोले, भरत पांडे, रुपेश गाठे, गजानन मेंदूले यांनी शहरातील नागरिकांनी या भक्तिमय कार्यक्रमाचा लाभ घ्यावा व मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

# फार्मर कप स्पर्धा-गटशेतीतून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना आर्थिक समृद्धीकडे नेणारी चळवळ-भूषण कडू

## गौळ येथील संघर्ष शेतकरी गटाला प्रथम पुरस्कार

**देवळी । प्रतिनिधी**

पाणी फाउंडेशनच्या सत्यमेव जयते फार्मर कप २०२४ स्पर्धेत देवळी तालुक्यातील गौळ येथील संघर्ष शेतकरी गटाने प्रथम पुरस्कार पटकावला आहे. पुणे येथे आयोजित या पुरस्कार सोहळ्यात कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पाणी फाउंडेशनचे संस्थापक अभिनेते आमिर खान, किरण राव आणि सत्यजित भटकळ यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला.



पुरस्कारप्राप्त गटाचा संत बाबाराव खराबे महाराज संस्थान, गौळ येथे विशेष सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. या वेळी युवा संघर्ष मोर्चाचे अध्यक्ष किरण ठाकरे आणि त्यांच्या टीमने संघर्ष शेतकरी गटाचे अभिनंदन केले. शेतकऱ्यांचा शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला आणि त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी पाणी फाउंडेशनचे विदर्भ समन्वयक भूषण कडू यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत गटशेतीच्या फायद्यांवर भर दिला. त्यांनी सांगितले की, फार्मर कप ही शेतकऱ्यांना आर्थिक समृद्धीकडे नेणारी चळवळ आहे. निसर्गातील बदल, अस्थिर बाजारभाव आणि शेतीवरील संकटे यावर मात करण्यासाठी गटशेती ही अधिक शाश्वत आणि फायदेशीर पद्धत आहे.पुरस्कारप्राप्त शेतकऱ्यांनी गावातील इतर शेतकऱ्यांना गटशेतीचा अवलंब करण्याचे आवाहन केले. रामभाऊ अंबुरे यांनी शेतकऱ्यांना सांगितले की, गटशेतीच्या माध्यमातून शास्त्रशुद्ध पद्धतीने प्रशिक्षण देऊन कमी खर्चात अधिक उत्पादन घेता येते.कार्यक्रमात युवा संघर्ष मोर्चाचे प्रविण काळे, गौतम पोपटकर, डॉ. आशिष दिघीकर, मनिष पेटकर, गौरव खोपाळ, मनोज नागपूरे, प्रमोद भेंडे, अरविंद कांबळे, कुश नागपुरे यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक जगदीश भोयर यांनी केले, तर आभार तृप्ती दिलीप नागपुरे यांनी मानले.

# पुलगावमध्ये पाडवा पहाट साठी पं. अजित कडकडे यांचे सुमधुर गायन



**पुलगाव । प्रतिनिधी**

भारतीय संस्कृतीतील गुढीपाडवा हा नववर्ष दिन पारंपरिक उत्साहात साजरा करण्यासाठी पुलगाव येथे दरवर्षी पाडवा पहाट या विशेष संगीत कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. यंदा या सोहळ्यात सुप्रसिद्ध गायक पंडित अजित कडकडे व संच (मुंबई) यांची भक्तिमय संगीत मैफल रंगणार आहे.

विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्था मर्या., पुलगाव व पाडवा पहाट आयोजन समिती, पुलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने ३० मार्च २०२५ (चैत्र शुक्ल १, शके १९४७, युगाब्ध ५१२७) रोजी पहाटे ५.०० ते ८.३० या वेळेत हा भव्य कार्यक्रम पं. दिनदयाल उपाध्याय चौक, बालाजी हॉटेल समोर, पुलगाव येथे आयोजित करण्यात आला आहे.

या भक्तिरसपूर्ण संगीतमय स्वागत सोहळ्यासाठी नागरिकांनी शुचिर्भूत होऊन, मंगल वेषात, संपूर्ण कुटुंबासह उपस्थित राहावे व तन-मन-धनाने सहकार्य करावे, असे आवाहन पाडवा पहाट आयोजन समितीचे अध्यक्ष बबन ल. बरवड व विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष प्रदीप ना. पांडे यांनी केले आहे.शहरातील नागरिकांनी या भक्तिमय कार्यक्रमाचा आनंद घ्यावा आणि नववर्षाचे स्वागत संगीताच्या माध्यमातून करावे, असे आयोजकांकडून आवाहन करण्यात आले आहे.

# वणव्यामुळे मौल्यवान वनसंपदा भस्मसात ;प्राणहिता वनपरिक्षेत्राचे दुर्लक्ष

**अहेरी । प्रतिनिधी**

सिरोंचा वन विभागातील कमलापूर वनपरिक्षेत्रात अवैध वृक्षतोड प्रकरण ताजे असतानाच आता लगतच्या प्राणहिता वनपरिक्षेत्र स्थित रेपणपल्ली जंगल परिसरात लागलेल्या वणव्यामुळे मौल्यवान वनसंपदा भस्मसात होताना दिसत आहे.त्यामुळे सिरोंचा वन विभागात चाललंय तरी काय ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

सिरोंचा वन विभागातील प्राणहिता स्थित रेपणपल्ली वनपरिक्षेत्रात राष्ट्रीय महामार्गाच्या लगत असलेल्या जंगल परीसरात २७ मार्च रोजी रात्रीच्या सुमारास मोठ्या प्रमाणात आगीचा तांडव सुरू होता.दिवसभर सुरू असलेल्या आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी रेपणपल्ली वनपरिक्षेत्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कुठलेच उपाययोजना न केल्याने रात्रीच्या सुमारास या परिसरात आगीने रौद्ररूप धारण केले होते.प्राणहिता वनपरिक्षेत्र स्थित रेपणपल्ली पासून हाकेच्या अंतरावर हा प्रकार सुरू होता मात्र याकडे वन विभागाने अक्षरशः दुर्लक्ष केले होते. त्यामुळे मौल्यवान वनसंपदा नष्ट होऊन वन्य प्राण्यांचा जीवितास धोका निर्माण झाला.

पूर्व विदर्भातील पानझडीच्या जंगलांना मार्च महिन्याच्या प्रारंभापासूनच मोठ्या प्रमाणात वणवा लागण्याचे प्रकार घडतात. जंगलांना आगी लागण्याची अनेक कारणे आहेत.मात्र



वनविभागाच्या दुर्लक्षितपणामुळे मौल्यवान वनसंपत्ती भस्मसात होत असल्याचा प्रकार रेपणपल्ली वन परिक्षेत्रात बघायला मिळाला. यावर पर्यायी उपाययोजना करणे गरजेचे आहे. मात्र वनविभागाचे अधिकारी आणि कर्मचारी गेले तरी कुठे ? असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे. वनविभागाच्या दुर्लक्षितपणामुळे हा प्रकार आणखीनच वाढल्याचे दिसून येत असून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या गंभीर बाबीकडे लक्ष देण्याची मागणी परिसरातील नागरिक आणि वन्यप्रेमीकडून केली जात आहे.विशेष म्हणजे या मोसमात वनविभागाकडून फायर लाईनचे सोंग मुद्दाम केले जाते. कारण यातून मोठ्या प्रमाणावर आर्थिक चिरीमिरी प्रकार घडत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे.अगोदरच या भागात मोठया प्रमाणात अवैध वृक्षतोड सुरू आहे.असे असताना देखील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.मागील काही दिवसंपासून रेपणपल्ली वनपरिक्षेत्रात असे प्रकार दिसून येत आहे. या राष्ट्रीय महामार्गावरून ये-जा करणारे नागरिक सदर प्रकार बघून संताप व्यक्त करीत आहेत हे विशेष.

# गडचिरोली व छत्तीसगडमध्ये वाहन चोरी करणारे दोघे जेरबंद

**गडचिरोली । प्रतिनिधी**

गडचिरोली जिल्ह्यात अवैध वाहन चोरीचे प्रकार वाढत असल्याने पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. या अनुषंगाने कोटगुल पोलिसांनी वाहन चोरीच्या गुन्ह्यातील दोन आरोपींना छत्तीसगडमधील टेमली गावातून अटक केली असून, ९ दुचाकींसह ३.१५ लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.दि. २४ मार्च रोजी कोटगुल पोलीस ठाण्यात वाहन चोरीचा गुन्हा नोंद झाला होता. तपासादरम्यान पोलीस उपनिरीक्षक दयानंद शिंदे यांनी सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने आरोपी प्रदीप कुमार फुलसिंग कोडापे (वय १९, रा. टेमली, ता. मोहल्ला, जि. मानपूर-मोहल्ला, छत्तीसगड) याची ओळख पटवली. त्यानंतर गुप्त माहितीच्या आधारे टेमली गावातून त्याला ताब्यात घेण्यात आले. आरोपीला विश्वासात घेऊन चौकशी केल्यावर त्याने साथीदार टेमनलाल रामखिलावन साहू (वय १९, रा. चिलमगोटा, ता. दौंडी लोहारा, जि. बालोद, छत्तीसगड) याच्यासोबत मिळून वाहन चोरी केल्याची कबुली दिली. त्यांनी सीजी-०७-बीव्ही-५६५३ क्रमांकाची दुचाकी (किंमत ३०,००० रुपये) चोरी केल्याचे सांगितले. दि. २५ मार्च रोजी दोन्ही आरोपींना अटक करून



न्यायालयात हजर केले असता तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. चौकशीदरम्यान आणखी गुन्हे उघडकीस आले. यात कोरची पोलीस ठाण्यातील गुन्हा क्र. ०२९/२०२५, छत्तीसगडमधील बसंतपूर पोलीस ठाण्यातील गुन्हा क्र. ०९७/२०२५ यासह अन्य गुन्ह्यांचा समावेश आहे. या गुन्ह्यांसह इतर ६ दुचाकी अशा एकूण ९ दुचाकी (किंमत ३,१५,००० रुपये) पोलिसांनी जप्त केल्या आहेत.पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलीस अधीक्षक (अभियान) यतिश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) एम. रमेश, उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. या कारवाईत पोउपनि. कृष्णा सोळंके, पोउपनि. दयानंद शिंदे, पोहवा भजनराव कोडाप, श्यामलाल नैताम, पोअं विनय सिध्दगु, किशोर बावणे, अनिल मडावी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. तपास पोउपनि. दयानंद शिंदे करीत आहेत.या कारवाईमुळे गडचिरोली व छत्तीसगडमध्ये वाहन चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश झाला असून, पोलिसांनी चोरीच्या वाहनांचा मोठा साठा हस्तगत केला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील वाहन चोरीच्या गुन्ह्यांना आळा बसण्याची शक्यता आहे.

## अल्पसंख्याक कल्याण योजनांचा आढावा

# जैन समाजभवन व साधुसंतांसाठी निवाऱ्याची आवश्यकता-ललीत गांधी

## जैन व्यापाऱ्यांनी उद्योग-व्यवसायात सक्रिय सहभाग नोंदविण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन



**गडचिरोली । प्रतिनिधी**

गडचिरोली जिल्ह्यातील जैन समाजासाठी स्वतंत्र समाजभवन उभारणे ही काळाची गरज असून या समाजाचे धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबविण्यासाठी हे भवन अत्यंत उपयुक्त ठरेल. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने तातडीने समाजभवनासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून देण्याच्या सूचना जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष तथा राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य ललीत गांधी यांनी आज गडचिरोली येथे घेतलेल्या आढावा बैठकीत दिल्या.



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित या बैठकीत जिल्हा प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत जैन समाजाच्या विविध गरजांचा आणि केंद्र व राज्य सरकारच्या अल्पसंख्याक कल्याण योजनांचा सखोल आढावा घेण्यात आला. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे, अपर जिल्हाधिकारी विवेक घोडके, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भुयार, निवासी उपजिल्हाधिकारी सुनिल सुर्यवंशी, जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी श्रीराम पाचखेडे आदी उपस्थित होते.

श्री. गांधी यांनी जैन समाजासाठी समाजभवन सोबतच पायी प्रवास करणाऱ्या जैन साधू-संतांसाठी महामार्गालगत निवाऱ्याच्या सुविधा निर्माण करण्याचे, तसेच जिल्हा अल्पसंख्यांक कल्याण समितीत जैन समाज व इतर सर्वच अल्पसंख्यांक समाजातील प्रतिनिधीचा समावेश करण्याच्या सूचना दिल्या. जैन समाज हा पारंपरिक दृष्टिकोनातून स्वावलंबी असला, तरी काही भागांत त्यातील अनेक कुटुंबे आजही दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत आहेत. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यात जैन समाज अद्याप मागे आहे. त्यामुळे या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून त्या समाजाच्या गरजू घटकांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे, असे श्री. गांधी यांनी स्पष्ट केले.या अनुषंगाने त्यांनी प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम, अल्पसंख्यांक बहुल नागरी व ग्रामीण क्षेत्र विकास योजना, मदरसा आधुनिकीकरण योजना, पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण इत्यादी योजनांचा आढावा घेतला. जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी श्रीराम पाचखेडे यांनी या योजनांची माहिती सादर केली.बैठकीनंतर श्री. ललीत गांधी यांनी गडचिरोली जिल्ह्यातील जैन समाजातील व्यापाऱ्यांशी संवाद साधला. गडचिरोली जिल्हा वेगाने विकासाच्या दिशेने वाटचाल करत आहे. विविध औद्योगिक व व्यापारिक क्षेत्रांमध्ये येथे मोठ्या संधी उपलब्ध होत आहेत. जैन समाजाने येथील उद्योग व्यापारात सक्रीयसहभाग नोंदविण्यासाठी व जिल्ह्याची अर्थव्यवस्था विकसित करण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन त्यांनी केले. श्री. गांधी यांनी स्थानिक व्यापाऱ्यांना केंद्र व राज्य सरकारच्या उद्योगविषयक योजनांबाबत मार्गदर्शन केले. बैठकीला जिल्हा भूसंपादन अधिकारी प्रसेनजीत प्रधान, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक निलेश गायकवाड, नगरपालीकेचे मुख्याधिकारी सुर्यकांत पिदुरकर, शिक्षणाधिकारी वासुदेव भुसे (माध्यमिक), बाबासाहेब पवार (प्राथमिक), जिल्हा क्रीडा अधिकारी भास्कर घटाळे इतर संबंधीत अधिकारी तसेच जैन समाजाचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुलगावमध्ये बाल हिंद गणेश मंडळाचा सर्वधर्म समभावाचा संदेश

## २६ व्या मुबारक रोजा पर्वावर शरबत वाटपाने हिंदू-मुस्लिम एकतेचा आदर्श

**पुलगाव । प्रतिनिधी**

माहे रमजानच्या पवित्र २६ व्या रोजा पर्वाच्या मुबारक प्रसंगी पुलगाव येथे बाल हिंद गणेश मंडळाच्या वतीने सर्वधर्म समभावाचा संदेश देणारा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

नमाज-ए-मगरिबनंतर जामा मस्जिद, शहीद भगतसिंग चौकात शाही शरबत वाटप करण्यात आले, तसेच मुस्लिम समाजातील मौलाना, हाफिज, मुअज्जम आणि ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला.हा सत्कार पंडित अंकित शास्त्री यांच्या हस्ते करण्यात आला. विशेष म्हणजे मुस्लिम समाजानेही पंडित अंकित शास्त्री यांचा भगवी वस्त्र देऊन सत्कार केला आणि राष्ट्रीय एकता, हिंदू-मुस्लिम बंधुभाव, तसेच देशात अमन-चैन कायम राहावा असा संदेश दिला.



नुकतेच वर्धा जिल्हा मानवाधिकार आयोगाचे नवनियुक्त अध्यक्ष इरफान बेग यांचा सत्कार माजी नगराध्यक्ष मनीषकुमार साहू यांच्या हस्ते करण्यात आला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पवन व्यास, अमित ददगाल, इरफान बेग, गजू पचारे, निक्कू साहू, शुभम गुप्ता, नीरज ढगे, ढेनी शर्मा, पलाश चाडक, आरिफ कुरेशी, जाकीर खान, महेश दिघाडे, अनिल मगर, तेजस ढोणे, अमजद खान, जावेद खान, अनमोल साहू, वेदांत साहू, मनोज कानेकर, रामेश्वर वाघ, रमेश सावरकर, मुन्ना शुक्ला, पवन साहू, करामत भाई, राजू विरूळकर, जमील भाई, शाबीर कुरेशी, मौला शरीफ, अँड. अली, राजेंद्र रवाडे, अब्दुल सलीम, मुन्ना सिद्दीकी, मुस्ताक हुसैन, रवी केसरवानी, दीपक छालिवाल, अविनाश सांगोले, विक्की साहू आदी नागरिकांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.या उपक्रमाद्वारे हिंदू-मुस्लिम ऐक्याचा सुंदर संदेश देण्यात आला आणि समाजात बंधुत्व व शांततेचा आदर्श निर्माण करण्यात आला.

# तुळसकर इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश


**हिंगणघाट । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने बीबीए पहिल्या सत्राच्या हिवाळी २०२४ परीक्षेचा निकाल जाहीर केला असून, तुळसकर इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी, हिंगणघाट या नव्याने सुरू झालेल्या महाविद्यालयाने पहिल्याच बॅचमध्ये ९८% निकालाची चमकदार कामगिरी केली आहे. या उल्लेखनीय निकालामुळे विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा उमटवला आहे.



या परीक्षेत कु. सलोनी राकेश बैसवारे हिने ७८.५% गुण मिळवून प्रथम क्रमांक, कु. समिया अबीद हुसैन हिने ७६.४७% गुणांसह द्वितीय क्रमांक, तर कु. राशी अजय जैसवाल हिने ७५.६६% गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल विद्या विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. उमेशजी तुळसकर यांनी त्यांचे अभिनंदन करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच विद्या विकास ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य नितेश रोडे, तुळसकर इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. महेंद्रजी गुंडे आणि तुळसकर इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे प्राचार्य राकेश साटोणे यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक केले.या यशामागे महाविद्यालयाच्या प्राचार्यांसह बीबीएच्या प्राध्यापिका आचल महाजन, बीसीएच्या प्राध्यापिका जयश्री वैद्य, श्रद्धा राऊत आणि इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे कठोर परिश्रम आहेत. विद्यार्थ्यांना वेळोवेळी योग्य मार्गदर्शन करण्यात आले, तसेच त्यांनी अभ्यासात सातत्य ठेवत महाविद्यालयाचे नाव उंचावले. या शानदार निकालाबद्दल महाविद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण असून, सर्व स्तरांतून विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

# निर्मला इन्स्टिट्यूट सामाजिक संस्थेची वैजापूर तालुक्यात शेतकरी महिलांना मार्गदर्शन भेट



**वैजापूर । प्रतिनिधी**

निर्मला इन्स्टिट्यूट सामाजिक संस्था, वैजापूर यांच्या वतीने २७ मार्च २०२५ रोजी तालुक्यातील विविध गावांना भेट देण्यात आली. या दौर्यात संस्थेच्या मार्गदर्शक मागरिट ताई, तारिका ताई, इरफान सर, तसेच बेलगाव व चोरवाघलगाव येथील शेतकरी महिला सहभागी झाल्या होत्या.

संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी माळीवाडगाव येथील शेतकरी गोरखनाथ गोरे यांच्या गांडूळ खत प्रकल्प, शेवगा बीज प्रकल्प आणि जांभूळ फळझाड बागेचा अभ्यास दौरा केला. यावेळी गोरखनाथ गोरे यांनी शेतकरी महिलांना गांडूळ खत उत्पादन, त्याचे फायदे, शेवगा शेतीतून होणारे उत्पन्न आणि फळझाड लागवडीचे महत्त्व सोप्या भाषेत समजावून सांगितले.

महिला शेतकऱ्यांनी या माहितीमुळे प्रभावित होत शेवगा लागवडीचा निर्धार व्यक्त केला. त्यांनी कमी खर्चात जास्त उत्पादन मिळविण्यासाठी शेवगा शेती करण्याची इच्छा व्यक्त केली.

संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी गोरखनाथ गोरे यांचे आभार मानत, त्यांनी सुरू केलेल्या शेतीविषयक उपक्रमांचे कौतुक केले. या भेटीमुळे महिलांना शेतीत नव्या संधी मिळण्यास मदत होणार आहे, असे मत संस्थेच्या प्रतिनिधींनी व्यक्त केले.

# इंदापूर शहराला दूषित पाणीपुरवठा भाजप युवा मोर्चाकडून प्रशासनाला निवेदन

**इंदापूर । प्रतिनिधी**

गेल्या महिनाभरापासून इंदापूर शहरात दूषित पाणीपुरवठा होत असून, त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या संदर्भात भारतीय जनता पक्ष युवा मोर्चाच्या वतीने इंदापूर नगरपालिका मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देऊन त्वरित उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे. यावर आठ दिवसांत कार्यवाही न झाल्यास भाजपच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.



इंदापूर शहराला गेल्या अनेक दिवसांपासून दूषित पाणीपुरवठा होत असून, या पाण्याला दुर्गंधी येते. नागरिकांना नाईलाजाने हेच पाणी प्यावे लागत असल्याने आरोग्याच्या समस्या वाढल्या आहेत. शहरात मोठ्या प्रमाणात जुलाब, गॅस्ट्रो यांसारखे आजार पसरत आहेत, मात्र प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप भाजप पदाधिकाऱ्यांनी केला आहे.शहरात शुद्ध पाण्याचा पुरवठा सुरळीत करावा, नादुरुस्त हातपंप दुरुस्त करावेत आणि पाण्याचे नियोजन योग्य प्रकारे करण्यात यावे, अशा मागण्या या निवेदनात करण्यात आल्या आहेत. प्रशासनाने वेळीच दखल घेतली नाही, तर भाजप युवा मोर्चाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा या वेळी देण्यात आला.याप्रसंगी भाजप इंदापूर शहराध्यक्ष किरण गानबोटे, उपाध्यक्ष समीर सूर्यवंशी, युवा मोर्चा अध्यक्ष लखन जगताप, शहर सरचिटणीस नवनाथ शिंदे, सचिव तानाजी देशमुख, श्रीनिवास सातपुते, उपाध्यक्ष सागर कवितके, सचिव रिजवान सय्यद, व्यापारी आघाडी अध्यक्ष नंदकुमार पुजारी, कुणाल तौर, सुहास जकाते, सुरज चुटके, महेश पाठक, युवराज गानबोटे यांच्यासह अनेक भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

# फार्मर आयडी नोंदणीसाठी अंतिम मुदत ३१ मार्च

## शेतकऱ्यांना त्वरित नोंदणी करण्याचे आवाहन

**जव्हार । प्रतिनिधी**

तालुक्यातील शेतकऱ्यांनी ३१ मार्चपर्यंत फार्मर आयडी नोंदणी पूर्ण करावी, जेणेकरून शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळू शकेल, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी जयराम आढळ आणि कृषी पर्यवेक्षक जयेश बोर्डे यांनी केले आहे.



या मोहिमेला सुरुवात झाली असून, जव्हार कृषी विभाग, तहसीलदार कार्यालय आणि पंचायत समितीच्या वतीने तालुक्यात विविध ठिकाणी फार्मर आयडी नोंदणीसाठी कॅम्प आयोजित करण्यात आले आहेत.फार्मर आयडीमध्ये शेतजमिनीची माहिती, पेरणीचा तपशील, जनावरांची संख्या आणि विविध शासकीय योजनांच्या लाभांची नोंद असणार आहे.तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपल्या नजीकच्या महा ई-सेवा केंद्रात जाऊन त्वरित नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# जनसुरक्षा विधेयकातील तरतुदींमध्ये सुधारणा कराव्यात इंडियन लीगल प्रोफेशनल एसोसिएशनची मागणी

**वरोरा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने प्रस्तावित जनसुरक्षा विधेयक क्रमांक ३३ मध्ये संविधानातील अनुच्छेद १४ आणि १९ चे उल्लंघन होणार असल्याने त्यामध्ये आवश्यक सुधारणा कराव्यात, अशी मागणी बामसेफ प्रणीत इंडियन लीगल प्रोफेशनल एसोसिएशनतर्फे महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाला निवेदनाद्वारे करण्यात आली.

हे निवेदन तहसीलदार, वरोरा मार्फत महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबईचे सचिव जितेंद्र भोळे यांच्याकडे पाठविण्यात आले.




महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्ध पत्रक क्रमांक डी. जी. आय.पी.आर-२०२४-२५/६९६१, दि. ८ मार्च २०२५ नुसार, राज्यातील प्रादेशिक राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांवर बंदी घालण्याचा तसेच सरकारविरोधात प्रश्न विचारण्यास अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याने, या विधेयकात आवश्यक सुधारणा कराव्यात, अशी भूमिका संघटनेने मांडली आहे.सदर प्रसंगी अॅड. मनोहर पाटील, प्रा. सूचिता खोब्रागडे, सुशीला तेलमोरे, सुयोग डंबारे, विकास काळे, रंजन काळे आदी उपस्थित होते.

# आ.रमेश पाटील बोरणारे यांची पंचायत राज समिती व मराठी भाषा समिती सदस्यपदी निवड

**वैजापूर । प्रतिनिधी**

वैजापूर तालुक्याचे लोकप्रिय आमदार रमेश पाटील बोरणारे यांची महाराष्ट्र विधिमंडळाच्या पंचायत राज समिती व मराठी भाषा समितीच्या सदस्यपदी निवड झाली आहे.



सलग दोन पंचवार्षिक निवडणुकांमध्ये मोठ्या मताधिक्याने विजय मिळवून आमदार झालेल्या रमेश पाटील बोरणारे यांच्या या निवडीमुळे वैजापूर तालुक्यात आनंदाचे वातावरण आहे.या निवडीचे स्वागत करत शिंदे गटाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आमदार बोरणारे यांचे अभिनंदन केले. तसेच गोळवाडी गावचे माजी सरपंच किरण पगार आणि बाबासाहेब भाऊ शिंदे (रामनगर) यांनीही त्यांचे अभिनंदन केले आहे.

## एका हातात बंदूक आणि दुसऱ्या हाताने मोहफुल संकलन

# ‘त्या’ वयोवृद्ध महिलेसाठी भामरागड पोलिसांची अशीही संवेदनशीलता

**अहेरी | प्रतिनिधी**

पोलीस म्हणजे नागरिकांची सुरक्षा आणि कायदा व सुव्यवस्था राखणारे रक्षक एवढीच त्यांची ओळख. मात्र ते गुन्हेगारांवर कारवाई करतानाच आपत्कालीन परिस्थितीत मदत करतात आणि नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेतात तसेच वेळप्रसंगी नागरिकांना मदतीचा हात देखील देतात.याची प्रचिती परत एकदा भामरागड तालुक्यात दिसून आली.भामरागड तालुक्यातील दरबाच्या जंगल परिसरात नक्षल शोध मोहीम राबविणाऱ्या पोलीसांनी मोहफुल संकलन करणाऱ्या एका वयोवृद्ध महिलेच्या मदतीला धावल्याने पोलिसांमधील संवेदनशीलता दिसून आली.

सध्या गडचिरोली जिल्ह्यात मोहफुल संकलन करण्याचा हंगाम सुरू आहे.जिल्ह्याचा दक्षिण भाग हा घनदाट जंगलांनी व्यापला असून या जंगलात मोठ्या प्रमाणात मोहाचे झाडं आढळून येतात. या भागातील आदिवासी बांधव भल्या पहाटे मोहफुल संकलनासाठी घराबाहेर पडताना दिसून येत आहेत.यात सर्वात जास्त वयोवृद्धांचा समावेश आहे. कल्पवृक्ष म्हणून ओळख असलेल्या मोहाच्या झाडाचा प्रत्येक भाग महत्त्वाचा आहे. त्यात मोह फुलांचे विशेष महत्त्व आहे.या मोसमात मोहफुल संकलन आणि तेंदूपत्ता संकलन करून आदिवासी बांधव बऱ्यापैकी पैसे गोळा करतात.दारूसाठी बदनाम असलेल्या मोह फुलांमध्ये अनेक पौष्टिक तत्व असतात तसेच मोह फुलांपासून विविध प्रकारचे खाद्यपदार्थ तयार केले जातात. त्यामुळेच मोहफुलांची मोठी मागणी आहे.

या मोसमात सर्व कामधंदे बाजूला ठेवून आदिवासी बांधव भल्या पहाटेपासूनच मोहफुल संकलन करण्याच्या कामात व्यस्त असल्याचे दिसून येत आहेत.भामरागड तालुक्यातील अतिदुर्गम दरबा गावाच्या जंगल परिसरात अशीच एक वयोवृद्ध महिला मोहफुल संकलन करत असल्याचे लक्षात येताच



नक्षल शोध मोहीम राबविणारे पोलिसांनी हातभार लावत त्या महिलेला मोहफुल संकलनाच्या कामात मदत करताना दिसून येत आहेत.भामरागड तालुका मुख्यालयातील पामुलगौतम नदीपलीकडील भाग हा नक्षल्यांचा गड मानला जातो.मात्र,मागील काही महिन्यातच पेनगुंडा,नेलगुंडा आणि कवंडे येथे गडचिरोली पोलीस दलाने नवीन पोलीस स्टेशन उभारल्याने हा परिसर आता विकासाच्या मुख्य प्रवाहात येत आहे.या भागातील आदिवासींना मूलभूत सुविधा देण्यासाठी गडचिरोली पोलीस कसोशीने प्रयत्न करीत आहेत.अश्यातच या भागात आता मोठ्या प्रमाणात नक्षल शोध मोहीम देखील राबविण्यात येत आहे.भामरागडचे उप विभागीय पोलीस अधिकारी अमर मोहिते यांनी क्यूआरटी पथक,स्थानिक पोलीस आणि सीआरपीएफच्या जवानांना घेऊन २७ मार्च रोजी नक्षल शोध मोहीम राबवित असताना दरबा गावाच्या जंगल परिसरात एक वयोवृद्ध महिला मोहफुल संकलन करताना आढळले. उन्हाचे चटके खात घामाघूम झालेल्या आजीची अवस्था पाहून पोलिसांना दया आली आणि लगेच उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी आजीला मोहफुल संकलनाच्या कामात हातभार लावण्यास पुढाकार घेतला.लगेच सर्वच जवानांनी सहकार्य करत दहा मिनिटातच मोहफुल संकलन करून दिले. दोन हातांनी मोहफुल संकलन करताना त्या वयोवृद्ध महिलेला किमान एक ते दीड तास लागणार होता.मात्र,भामरागड पोलिसांमुळे केवळ दहा मिनिटांत तिचा काम सोयीस्कर झाला.आदिवासीबहुल व नक्षलग्रस्त भागात नक्षलवाद्यांशी दोन हात करणाऱ्या पोलिसांची परत एकदा संवेदनशीलता दिसून आली.

## पुणे जिल्हा अभिलेख कार्यालयाच्या कामकाजावर चौकशीचा फेरा

**शिरूर | प्रतिनिधी**

पुणे जिल्हा अभिलेख कार्यालय आणि हवेली तालुका उपअधीक्षक कार्यालयाच्या कारभारावर नागरिकांच्या तक्रारी वाढत असल्याने राज्य सरकारने चौकशीचे आदेश दिले आहेत. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्याच्या अपर जमाबंदी आयुक्त सरिता नरके यांना गेल्या साडेतीन वर्षांच्या कामकाजाची चौकशी करण्याचे निर्देश दिले.

नागरिकांनी थेट राज्य शासनाकडे तक्रारी करत पैसे घेतल्याशिवाय काम न करणे, मोजण्यांमध्ये अनियमितता, अपिलांचे निकाल फिरवणे, चौकशीला टाळाटाळ करणे, नागरिकांची तक्रार ऐकून न घेणे आणि अरेरावीची वागणूक यासारख्या आरोपांची माहिती दिली होती.या प्रकरणाच्या चौकशीसाठी राज्य सरकारने विशेष समिती नियुक्त केली आहे. या समितीत संजय




कुंभार (अधीक्षक, जमाबंदी आयुक्त कार्यालय), राजू रोकडे (वरिष्ठ लिपिक), सचिन एकबोटे (उपअधीक्षक, चांदवड मुख्यालय), दयानंद जोशी (सहायक), समीर दाणेकर (नगर भूमापन अधिकारी, संभाजीनगर) आणि प्रशांत भोंडे (विशेष उपअधीक्षक, नाशिक) यांचा समावेश आहे.राज्य सरकारने ही चौकशी पारदर्शक राहील असे स्पष्ट केले आहे. कोणत्याही विशिष्ट अधिकाऱ्याला लक्ष्य न करता संपूर्ण कामकाजाची तपासणी केली जाईल. दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे अपर जमाबंदी आयुक्त सरिता नरके यांनी सांगितले. सरकारच्या या कारवाईमुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, दोषींवर कठोर कारवाई होण्याची मागणी करण्यात येत आहे. पुढील काही आठवड्यांत चौकशी समितीचा अहवाल येणार असून, यावर सरकार काय निर्णय घेते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## वसतीगृहातील निकृष्ट भोजना विरोधात विद्यार्थ्यांचा एल्गार

**वर्धा | प्रतिनिधी**

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी वसतीगृहातील निकृष्ट भोजनाविरोधात रस्त्यावर उतरून आंदोलन छेडले आहे. भोजनात अळ्या, किडे, झुरळ सापडत असल्याचा आरोप करत विद्यार्थ्यांनी प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला आहे.विद्यापीठातील भगतसिंग, राजगुरू, चंद्रशेखर आझाद यांच्या नावाने असलेल्या वसतीगृहातील भोजन अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून, त्यामुळे आरोग्य धोक्यात येत असल्याचा विद्यार्थ्यांचा आरोप आहे. वारंवार तक्रारी करूनही योग्य तो बदल न झाल्याने संतप्त विद्यार्थ्यांनी वसतीगृहासमोर आंदोलन सुरू केले.

विद्यार्थ्यांच्या मागण्या स्पष्ट आहेत - भोजनाचा दर्जा सुधारावा, त्यासाठी दैनंदिन मेन्यूकार्ड असावे, तसेच संबंधित जबाबदार व्यक्तींवर कारवाई करावी. प्रशासनाने



यासंदर्भात लेखी हमी द्यावी, अन्यथा आंदोलन सुरूच ठेवण्याचा इशारा विद्यार्थ्यांनी दिला आहे.

विद्यापीठ प्रशासनाने भोजनालयासाठी निविदा प्रक्रिया सुरू केली असली तरी ती अद्याप पूर्ण झालेली नाही. परिणामी, काही कर्मचाऱ्यांवरच भोजनालयाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. मात्र, या परिस्थितीत सुधारणा झाली नाही. त्यामुळेच विद्यार्थ्यांनी वसतीगृहातील सडलेल्या भाज्या रस्त्यावर आणून आपला निषेध नोंदवला.संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. आनंद पाटील यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. विद्यापीठाला नुकतेच पूर्णवेळ कुलगुरू लाभले असले तरी पदभार स्वीकारताच त्यांना या आंदोलनाचा सामना करावा लागत आहे.

या आंदोलनामुळे विद्यापीठातील प्रशासन, विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यातील वाद आणखी चव्हाट्यावर आले असून, विद्यार्थी त्यांच्या मागण्यांवर ठाम राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## विहीरगाव येथे दारूबंदी समिती गठीत अवैध दारू विक्री थांबवण्याचा निर्धार



**चिमूर | प्रतिनिधी**

विहीरगाव ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत दारूबंदी समिती गठीत करण्यात आली असून, गावात दारू व मादक पदार्थांच्या विक्रीवर संपूर्ण बंदी घालण्याचा ठराव मंजूर करण्यात आला.

ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच शितल प्रविण मूंढरे होत्या. दारूबंदी समितीच्या अध्यक्षपदी शिला युवराज गेडाम, उपाध्यक्षपदी दादाती अर्जुन जिवतोडे, सचिवपदी ताराबाई मारोती कोसरे, तर कोषाध्यक्षपदी उमेश मारोती कोसरे यांची निवड झाली.

ग्रामसभेत कलम ३७ नुसार गावात मादक पदार्थ विक्री व दारू कारखाना स्थापन करण्यास पूर्णतः बंदी घालण्यात आली आहे. महिला मंडळ आणि दारूबंदी समिती या निर्णयावर नियंत्रण ठेवणार असून, नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल.दारूबंदी समितीच्या सदस्यांनी चिमूर पोलीस स्टेशनला अधिकृत यादी सादर केली असून, अवैध दारू विक्री रोखण्यासाठी पोलिसांनी सहकार्य करावे, अशी मागणी केली आहे.यावेळी महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष दादाजी नैताम उपस्थित होते. ग्रामस्थांनी या निर्णयाचे स्वागत केले असून, गावात अवैध दारू विक्रीवर कायमचा आळा घालण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा सहावा हप्ता वितरीत

**मुंबई | प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न देण्यासाठी केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजना फेब्रुवारी २०१९ पासून सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकरी कुटुंबांना प्रति वर्ष ६,००० रुपये (दर हप्ता २,००० रुपये) त्यांच्या आधार व डीबीटी संलग्न सक्रीय बँक खात्यात जमा करण्यात येतात.

पंतप्रधानांच्या संकल्पनेतून साकारलेल्या प्रधानमंत्री कृषी सन्मान निधी योजनेत राज्य शासनानेही अनुदानाची भर घालून ’नमो शेतकरी महासन्मान निधी’ योजना २०२३-२४ पासून सुरू केली आहे. या योजनेद्वारे पीएम किसान योजनेतील वार्षिक ६,०००




रुपयांच्या लाभामध्ये महाराष्ट्र शासन आणखी ६,००० रुपयांची भर घालत असून, राज्यातील शेतकऱ्यांना एकूण १२,००० रुपये प्रतिवर्षी मिळत आहेत. पंतप्रधानांच्या शुभहस्ते दिनांक २६ ऑक्टोबर २०२३ रोजी शिर्डी येथून नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा पहिला हप्ता वितरीत करण्यात आला होता. आजअखेर या योजनेअंतर्गत एकूण ५ हप्ते वितरीत करण्यात आले असून, राज्यातील ९०.८६ लाख शेतकरी कुटुंबांना ८९६१.३१ कोटी रुपये लाभ त्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात आला आहे. पंतप्रधानांच्या शुभहस्ते डिसेंबर २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा १९ वा हप्ता वितरीत करण्यात आला. या हप्ता वितरण सोहळ्यात महाराष्ट्रातील ९२.८९ लाख शेतकरी कुटुंबांना १९६७.१२ कोटी रुपये निधीचा लाभ मिळाला. त्यानंतर केंद्र शासनाने पीएम किसान योजनेअंतर्गत आणखी ६५,०४७ लाभार्थ्यांना लाभ देण्याचे नियोजन केले आहे.त्यानुसार, राज्यातील ९३.२६ लाख शेतकरी कुटुंबांना नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा सहावा हप्ता म्हणून सुमारे २१६९ कोटी रुपयांचा लाभ आधार व डीबीटी संलग्न सक्रीय बँक खात्यात जमा करण्यात येत आहे.

## घरकुल धारकांना मोफत वाळू मिळावी; मनसेची मागणी



**वर्धा | प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने झाडगाव ग्रामपंचायतीला निवेदन देण्यात आले असून, घरकुल धारकांना शासनाच्या जाहीर आदेशानुसार मोफत वाळू (रेती) उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. राज्याचे महसूलमंत्री चंद्रकांत पाटील यांनी ४०० ब्रास वाळू (रेती) घरकुल धारकांसाठी मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, प्रत्यक्षात वाळू मिळत नसल्याने घरकुल बांधणी थांबली असून लाभार्थी अडचणीत आले आहेत. त्यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तातडीने वाळू उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

ग्रामपंचायतने १५ दिवसांत घरकुल धारकांना मोफत वाळू उपलब्ध करून दिली नाही, तर महाराष्ट्र नवनिर्माण सेना तीव्र आंदोलन छेडेल, असा इशारा देण्यात आला आहे. तसेच, यासंदर्भात ग्रामपंचायतीने योग्य ती पावले उचलावीत आणि वाळू त्वरित उपलब्ध करून द्यावी, अशी विनंती करण्यात आली आहे.

## परसोडा येथे मेंढपाळाच्या गोठ्यातून बकऱ्या चोरी, तालुक्यात टोळी सक्रिय

**वरोरा | प्रतिनिधी**

तालुक्यात बकऱ्या चोरीच्या घटना वाढू लागल्या असून परसोडा येथील मेंढपाळ अंबादास चामाटे यांच्या गोठ्यातून रात्रीतून बकऱ्या चोरीला गेल्याची घटना घडली आहे.

अंबादास चामाटे हे उदरनिर्वाहासाठी बकऱ्यांच्या व्यवसायावर अवलंबून आहेत. त्यांच्या गोठ्यात ४० बकऱ्या होत्या. दररोज प्रमाणे सायंकाळी सहा वाजता बकऱ्या बांधून ते गोठ्याजवळ झोपले. मात्र, पहाटे चार वाजता ते घराकडे गेले आणि सहा वाजता गोठा साफ करण्यासाठी परत आल्यावर बकऱ्या गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

या घटनेनंतर चामाटे यांनी गावकऱ्यांना माहिती दिली. सुमारे ५०,००० रुपये किमतीच्या बकऱ्या चोरीला गेल्या असल्याचे स्पष्ट झाले. त्यांनी तत्काळ वरोरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलीस पुढील तपास करत आहेत. गेल्या काही दिवसांत मांगली, टेमुर्डा या भागांतही बकऱ्या चोरीच्या घटना घडल्याची चर्चा आहे. त्यामुळे जनावरे चोरी करणारी टोळी तालुक्यात



सक्रिय असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

शेतकरी व मेंढपाळांचे मोठे नुकसान होत असल्याने पोलिसांनी सखोल चौकशी करून या टोळीला लवकरात लवकर पकडावे, अशी मागणी तालुक्यातील शेतकरी आणि मेंढपाळ करत आहेत.

## गंगा खटकाळे यांना राज्यस्तरीय आदर्श संस्था पुरस्काराने गौरव



**पंढरपूर | प्रतिनिधी**

ब्ल्यू स्टार सामाजिक व बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने २०२५ सालचा राज्यस्तरीय आदर्श संस्था पुरस्कार ’कल्पतरू उत्तुंग भरारी दिव्यांग बहुउद्देशीय संस्थेच्या’ संचालिका गंगा यशवंत खटकाळे यांना प्रदान करण्यात आला.

संस्थेच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत गंगा खटकाळे यांना सन्मानचिन्ह, मानाचा फेटा, श्रीफळ आणि शाल देऊन सन्मानित करण्यात आले.

योग भवन हॉल, पंढरपूर येथे झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी किशोर बागडे (मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नारी) होते. तसेच एकनाथ ननवरे, आनंद खटावकर, विमल बनसोडे, ब्ल्यू स्टार संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा सविता सुकाळे आदी मान्यवर उपस्थित होते.या पुरस्कारामुळे संस्थेच्या सामाजिक कार्याची मोठी पावती मिळाल्याचे मान्यवरांनी नमूद केले. संस्थेचे अध्यक्ष राहूल नागटिळक यांनी पुरस्कारासाठी आभार मानले.कार्यक्रमाला मोठ्या संख्येने पदाधिकारी, ग्रामस्थ आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .